Telegram : "Dnyanteerth"
**Swami Ramanand Teerth Marathwada University**
*"Dnyanteerth", Vishnupuri,*
Nanded – 431 606 (M.S.)

तार " ज्ञानतीर्थ "
**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ**
*"ज्ञानतीर्थ", विष्णुपुरी,*
नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

:: परिपत्रक ::

विषय : पदव्युत्तर अभ्यासक्रमातील जुन्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संधी बाबत

या परिपत्रकान्वये सर्व संबधितास कळविण्यात येते की, शैक्षणिक विभागाचे परिपत्रक क्र. शैक्षणिक/०१/अभ्यासक्रम संधी/२०१०–२०११/२८०५ दिनांक ०७.१२.२०१० नुसार ज्या पदव्युतर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना यापूर्वीच तीन किंवा तीन पेक्षा जास्त वेळा परीक्षेची संधी देण्यात आलेली आहे किंवा समकक्षता देण्यात आलेली आहे त्यांना जुन्या अभ्यासक्रमातील अनुत्तीर्ण राहिलेल्या विद्यार्थ्यांना उन्हाळी २०११ ही परीक्षेची शेवटची संधी राहील त्यानंतर अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना सर्व विषयाची नवीन अभ्यासक्रमा नुसार परीक्षा द्यावी लागेल असे कळविलेले होते.

तथापी याबाबत विद्यार्थ्यांकडुन वारंवार विचारणा होवुन परीक्षेची संधी देण्याबाबत मागणी होत होती. सबब सर्व पदव्युत्तर जुन्या अभ्यासक्रमातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना यापूर्वी ठरवुन दिल्याप्रमाणे नवीन अभ्यासक्रमातील समकक्ष विषयाची परीक्षा देण्यासाठी हिवाळी २०११ ही अंतिम संधी देण्यात येत आहे. एम.एस्सी.संगणकशास्त्र आणि जैवतंत्रशास्त्र या अभ्यासक्रमास समकक्षता दिलेली नाही त्यामुळे जुन्या अभ्यासक्रमा नुसार परीक्षा देण्याची अंतिम संधी देण्यात येत आहे. संबधित विद्यार्थ्यांना हिवाळी २०११ ही अंतिम संधी राहिल अशा विद्यार्थ्यांकडुन हमीपत्र घेवुन परीक्षा आवेदनपत्रासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

ही बाब ~~बाब~~ सर्व संबधीत विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. हा निर्णय माहित झाला नाही म्हणून त्याद्वारे एखादे न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास त्याची जबाबदारी संबधित महाविद्यालययांच्या प्राचार्यावर/संबधित संकुलाच्या संचालकावर राहील.

'ज्ञानतीर्थ' परिसर
विष्णुपुरी,नांदेड
जा.क्र.परीक्षा/पदव्युत्तर/२०११ २०११/2185-88
दिनांक: ०६.०९.२०११

परीक्षा नियंत्रक,

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव:

१) मा.प्राचार्य,सर्व सलग्नित विज्ञान पदव्युत्तर महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
२) मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर,
३) मा.संचालक, उपकेंद्र, लातूर,
४) मा.संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ

फोन नं: 0242 229294 / 229145 / 229543
फक्स नं. 02462 229520